# अध्यात्मिक भाग
# DAM, ACCRA नोव्हेंबेर २०२४

प्रिय जिल्हा प्रेषित आणि जिल्हा प्रेषित मदतनीस,

गेल्या अनेक आठवड्यांपासून, ''न्यू अपोस्टोलिक चर्चची लीटर्जी'' आणि ''मिनिस्टर्स गाईड'' हे दोन्ही आता चर्चची वेबसाइट ''nak.org'' वर ऑनलाइन उपलब्ध आहेत. हे करण्यासाठी आम्ही पुढाकार घेतला आहे कारण की आम्हाला याची खात्री आहे की ते चर्चमधील ऐक्याला बळ देण्यास उपयुक्त ठरेल. तसेच एका सुव्यवस्थित उपासना पध्दतीसह आमच्या चर्चचे नियम स्पष्ट आणि अचूक आहेत हे लोकांना दाखवून देणे, हे देखील यामागील एक उद्दिष्ट आहे. आणि ज्याद्वारे चर्चची एक सकारात्मक प्रतिमा तयार व्हावी. आपल्या सभासदांच्या सुरुवातीच्या प्रतिक्रिया खूप सकारात्मक होत्या. हे विशेषतः अफ्रिकेत प्रत्यक्षात दिसून आले, जिथे—इंटरनेटच्या व्यापक वापरामुळे—आपले बरेच सभासद आता माहिती आणि कागदपत्रे सहजपणे मिळवू शकतात जी त्यांच्याकडे या पूर्वी नव्हती.

''न्यू अपोस्टोलिक चर्चची उपासना पध्दती (लिटर्जी)'' याचे प्रकाशन शेवटचा आशीर्वाद या विषयी तुमच्याशी चर्चा करण्याची मला संधी देते. माझी अशी धारणा आहे की चर्चने अधिकृतपणे ठरवलेली सार्वजनिक उपासना पध्दती (लिटर्जी) यातील या घटकाचे महत्त्व नेहमीच योग्यप्रकारे समजून घेतले गेले नाही.

२ करिंथ १३: १४ मध्ये नोंदवलेल्या शब्दांसह मंडळीसाठी शेवटचा आशीर्वाद हा दिला जातो:

*''प्रभू येशू ख्रिस्ताची कृपा, देवाची प्रीती*
*आणि पवित्र आत्म्याची सहभागिता तुम्हा सर्वांसह असो!''*

या शब्दांचा अर्थ आणि त्याची व्याप्ती किती आहे?

**एका सूत्रापेक्षा अधिक—एक आशीर्वाद!**

अधिकारी उपासनेची (डिव्हाइन सर्व्हिस) समाप्ती दर्शविण्याचे चिन्ह म्हणून या शब्दांचे उच्चारण करतात. या वचनातील शब्दरचना एक इच्छा सूचित करते. एखाद्याला असा विचार करण्याचा मोह होऊ शकतो की अधिकारी केवळ अशी इच्छा व्यक्त करत आहेत की कृपा, प्रीती आणि सहभागिता ही विश्वासणाऱ्यांच्यासह असो, जसे की ते त्यांच्या घरी परतीच्या सुरक्षित प्रवासाची इच्छा व्यक्त करतात. प्रत्यक्षात, ते त्यापेक्षा अधिक असे आहे. देवाने या उद्देशासाठी नियुक्त केलेल्या सेवकाद्वारे उच्चारल्यावर, हे शब्द एक वास्तविक आशीर्वाद बनतात. ते दैवी सामर्थ्याने भरलेले आहेत आणि ते ऐकणाऱ्याला आध्यात्मिक लाभ देतात.

या आशीर्वादात, देव ऐकणाऱ्याला अभिवचन देतो की त्याची कृपा, प्रीती आणि सहभागिता त्यांच्या दैनंदिन जीवनात त्यांच्यासोबत असेल. आणि कारण देव ते सर्वकाही करतो ज्याविषयी तो बोलला आहे, यामुळे मंडळीला खात्री आहे की हे खरेच आहे. हे अभिवचन प्रत्येक ऐकणाऱ्याला दिले जाते. परंतु, प्रत्येक आशीर्वादाप्रमाणेच, त्याचा प्रभाव तो प्राप्त करणाऱ्याच्या विश्वासावर आणि वर्तणूकीवर अवलंबून असतो.

म्हणून, शेवटचा आशीर्वाद हे देवाकडून दिलेले अभिवचन आणि उपदेश दोन्ही आहेत.

**त्रैक्यत्वाचा आशिर्वाद**

२ करिंथ १३: १४ मधील परिच्छेद त्रैक्यत्वाचा स्पष्ट संदर्भ देते. येथे आपण हे लक्षात ठेवूया की देव एकच आणि त्रैक्य आहे. दैवी व्यक्तींपैकी प्रत्येक—पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा—खरा देव आहे. दैवी व्यक्ती एकमेकांपासून भिन्न आहेत परंतु एकच देव आहेत.

या संदर्भातच शेवटचा आशीर्वाद समजून घेणे आवश्यक आहे. बोलणारा हा, देव जो एक, देव जो सर्वशक्तिमान आणि देव जो परिपूर्ण आहे. देवाच्या कृती नेहमी पिता, पुत्र आणि पवित्र आत्म्याच्या कृती असतात. कृपा, प्रीती आणि सहभागिता हे प्रत्येक दैवी व्यक्तीशी अनुक्रमे जोडलेले नाहीत, परंतु तिन्ही लोकांसाठी समान आहेत. कोणीही असे म्हणू शकतो की पिता कृपा करतो, पुत्र सहभागिता देतो आणि आत्मा प्रीती आहे.

# अध्यात्मिक भाग
# DAM, ACCRA नोव्हेंबेर २०२४

**येशू ख्रिस्ताची कृपा**

या शब्दांद्वारे, देव आपल्याला येशू ख्रिस्तामध्ये दिलेल्या कृपेची आठवण करून देतो: त्याने आपल्याला निवडले आहे आणि आपल्याला त्याची मुले, त्याच्या गौरवाचे संयुक्त वारसदार बनवले आहे (इफिस १: ३-१४). त्याने आम्हाला आमच्या पापांची क्षमा देऊ केली आहे. शिवाय, आपल्याजवळ जे काही आहे ते आपल्या गुणवत्तेपेक्षा त्याच्या कृपेमुळे आहे आणि त्यासाठी आम्ही त्याचे देणे लागतो.

या आशीर्वादाने त्याच्याशी झालेली आपली भेट संपवत असताना, देव याची हमी देतो की

- काहीही झाले तरी, आम्ही त्याची मुले राहू—तो कधीही आमच्या निवडीवर शंका उपस्थित होऊ देणार नाही;
- त्या वाईटाच्या आरोपांपासून आपला बचाव करण्यासाठी आपण नेहमी ख्रिस्तावर विश्वास ठेवू शकतो (रोम ८: ३४);
- आपण त्याच्या कृपेची आशा करू शकतो—ही कृपा आपल्याला त्याच्या राज्यात प्रवेश करण्यासाठी आवश्यक असणारी परिपूर्णता प्राप्त करण्यास अनुमती देईल (१ पेत्र १: १३).

तथापि, ही हमी फक्त त्यांना लागू होते जे देवाला आनंद देणारे वर्तन करतात. देव आम्हाला प्रोत्साहन देतो की

- आम्ही देवाबरोबर नम्र राहावे, कारण आपण पूर्णपणे त्याच्या कृपेवर अवलंबून असतो, तसेच इतरांबरोबर नम्र राहावे कारण आपण सर्वजण पापी आहोत;
- आम्ही स्वतः देवाच्या खऱ्या मुलांसारखे वागावे की ज्यांना त्याच्या गौरवाचा वारसा प्राप्त करण्यासाठी बोलावले आहे;
- त्याच्याकडून आम्हाला मिळालेल्या देणग्यांचा वापर आम्ही इतरांची सेवा करण्यासाठी करू (१ पेत्र ४: १०).

**देवाची प्रीती**

आपण घरी जाण्यापूर्वी, देव पुन्हा एकदा आपल्यावरील त्याची प्रीती जाहीर करतो. तो जे काही करतो ते आपल्याला त्याच्याबरोबर कायमचे राहण्यास सक्षम करण्यासाठी करतो. आपल्या तारणाच्या आड येऊ शकेल असा कोणताही अडथळा तो आपल्या मार्गातून दूर करेल. तारण होण्यासाठी जे आवश्यक आहे ते तो आपल्याला देईल.

त्या बदल्यात, तो आपल्याला सर्व परिस्थितीत त्याच्या प्रीतीमध्ये टिकून राहण्यास सांगतो. देवाची इच्छा आहे की डिव्हाइन सर्व्हिसमधून विभक्त होत असताना आपण पुढील गोष्टी करू

- त्याच्या आज्ञा पाळण्याचा निर्धार करू;
- फायदा-तोटा याचा विचार करून नाही तर प्रीतीने त्याची सेवा करण्याचा संकल्प करू;
- देव जशी प्रीती करतो तशी प्रीती आपल्या सहमानवांवर करण्याची इच्छा बाळगू.

**पवित्र आत्म्याची सहभागिता**

हे आत्म्याद्वारे आहे की आपण देवाला ऐकू शकतो आणि त्याची इच्छा जाणून घेऊ शकतो. आपल्याला मार्गदर्शन, सांत्वन आणि सामर्थ्य पुरवण्यासाठी तो आपल्याशी बोलत राहील असे अभिवचन देव आम्हाला देत आहे. आणि तो आम्हाला सल्ला देत आहे की आपण प्रवचनात आणि आपल्या सदसद्विवेकबुद्धीमध्ये, आपल्याला तो जे सांगतो त्याकडे आपण लक्ष द्यावे.

ख्रिस्ताचा वारसा यामधील सहभागिता ही त्याच्या दु:खांच्या सहभागितेसह हातात हात घेऊन चालते (रोम ८: १७; फिलिप्पै ३: १०). देव आपल्याला चेतावणी देतो की आम्हावर संकटे येत राहतील. पण आम्हाला घाबरण्यासारखे काही नाही. तो आमच्यासोबत आहे. तो आमच्या प्रार्थना ऐकतो आणि त्यांना उत्तर देईल. आणि जर आपण प्रार्थना करण्यास अशक्त झालो तर आत्मा आपल्यासाठी मध्यस्थी करेल (रोम ८: २६-२७).

# अध्यात्मिक भाग
# DAM, ACCRA नोव्हेंबेर २०२४

आत्म्याचा सहभागिता ही प्रीतीची सहभागिता देखील आहे. आत्म्याने आपल्या अंतःकरणात ख्रिस्ताची प्रीती ओतली आहे. जेव्हा आपण आपल्या दैनंदिन जीवनात परत जातो तेव्हा आपण हे लक्षात ठेवूया की देवाने आपल्याला इतरांवर ते कसेही असले तरी प्रीती करण्यास सक्षम केले आहे – जर आम्हाला हे करायचे आहे, तर आम्हाला ते कृतीत आणावे लागेल आणि आम्हाला दैवी मदतीसाठी परमेश्वराकडे याचना करावी लागेल.

शेवटचा आशीर्वाद चर्चमधील आत्म्याच्या सार्वकालिक उपस्थितीची देखील साक्ष देतो. आम्हाला काळजी करण्याचे काहीही कारण नाही: आत्म्याला वधूला वरासोबत परिपूर्ण सहभागितेत नेण्यापासून काहीही रोखू शकणार नाही.

शेवटी, आत्म्याचा सहभागितेला संतांच्या सहभागितेपासून वेगळे करता येणारी नाही. आम्हा सर्वांचा आत्मा, विश्वास आणि भविष्य हे एकसारखेच आहे. आपल्या सर्वांना समान शब्द आणि समान भाकरी मिळते. आपण विभक्त होण्यापूर्वी, आपण सर्व एकाच शरीराचे, ख्रिस्ताच्या शरीराचे सदस्य आहोत हे विसरू नये असा उपदेश देव आम्हांला करतो. एकमेकांच्या सहभागितेत राहूनच आपण खऱ्या अर्थाने देवाशी संवाद साधू शकतो (१ योहान १: ३–७). आपण नेहमीच एकमेकांपासून वेगळे असे असणार आहोत. पण आपण आम्हामध्ये असणाऱ्या मतभेदांचे कैदी होऊ नये अशी देवाची इच्छा आहे! तो आम्हाला यावर विजयी होण्यास आणि चर्चच्या ऐक्यामध्ये सक्रियपणे आपले योगदान देण्यास सांगतो. आणि तो आम्हांला आठवण करून देतो की विश्वासणाऱ्यांची सहभागिता ही केवळ आध्यात्मिक नाही. हे एका ठोस मार्गाने, जे गरजेत आहेत त्यांच्यासह एकता म्हणून आणि या भैतिक जगाच्या वस्तू वाटून घेऊन व्यक्त केली जाते (१ योहान ३: १७–१८).

हे काही विचार आहेत जे संपूर्णपणे संपुष्टात येण्यापासून दूर आहेत. प्रेषित पौलाच्या ह्या शब्दांना वाढविण्याचे इतर मार्ग नक्कीच आहेत. मला फक्त शेवटच्या आशीर्वादाच्या महत्त्वावर जोर द्यायचा होता आणि एका विश्वासणाऱ्या हृदयामध्ये त्याचे काय परिणाम होऊ शकतात हे दाखवायचे होते. एक शेवटचा मुद्दा: हे आशीर्वाद ज्याच्याद्वारे उच्चारले जातात त्याला देखील लागू होतात. प्रिय प्रेषितांनो, मला मनापासून आशा आहे की तुम्ही याचा अनुभव घ्याल!